(महाराष्ट्र शासन)
राजर्षि छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
शेंडापार्क, कोल्हापूर-४१६०१३

दुरध्वनी :- ०२३१ - २६४१५८१ फॅक्स क्र. :- ०२३१ - २६४५२७१

जा.क्र.राछशामशावैमको/आस्था-१,२/करार/रिक्त पदे/६३५९/२०२३ दिनांक - ०७/१२/२०२३

# जाहिरात (थेट मुलाखत)

**विषय :- राजर्षि छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,कोल्हापूर येथील विविध विषयातील सहाय्यक प्राध्यापक व वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे थेट मुलाखतीद्वारे भरण्याबाबत...**

राजर्षि छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय कोल्हापूर या संस्थेत रिक्त असलेली विविध विषयातील सहाय्यक प्राध्यापक व वैद्यकीय अधिकारी पदे **करार पध्दतीने १२० दिवसांकरिता** भरण्याबाबत थेट मुलाखत दिनांक ०८.१२.२०२३ रोजी दुपारी ०३.०० वा. अधिष्ठाता कार्यालय, राजर्षि छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, शेंडापार्क, कोल्हापूर येथे घेण्यात येत आहे. सदरच्या जाहिरातीमधील पदसंख्या बदलण्याबाबतचा अथवा सदरची जाहिरात पुर्णतः रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठातांनी राखून ठेवला आहे.

तरी इच्छूक उमेदवारांनी शैक्षणिक मुळ कागदपत्रे व साक्षांकित कागदपत्रे घेवून स्वखर्चाने उपस्थित रहावे. सदर पदे भरण्याबाबतचे नियम व अटी प्रचलीत शासन निर्णयानुसार राहतील.

**A) Assistant Professor (Contract Basis)**

| Sr. No. | Subject | Qualification | Total | Institute Name |
|---|---|---|---|---|
| 1 | Anatomy | As per NMC Norms | 1 | RCSMGMC Kolhapur |
| 2 | Pathology | | 1 | |
| 3 | TB & Chest | | 1 | |
| | **Total** | | **3** | |

सहाय्यक प्राध्यापक या पदासाठी NMC मानकांनुसार पदवी/डी.एन.बी.अर्हता धारण केलेले बंधपत्रीत/वरिष्ठ निवासी पदाचा अनुभव असलेल्या उमेदवाराचा प्रथम प्राधान्याने विचार केला जाईल. उमेदवाराची निवड गुणांनुक्रमे व प्रयत्न (No.of Attempts) विचारात घेऊन करण्यात येईल.

अ) शैक्षणिक अर्हता :- NMC मानकांनुसार
ब) वयोमर्यादा (सहाय्यक प्राध्यापक) :- **खुल्या वर्गासाठी - ४० वर्षे (जाहिरात प्रसिद्धी दिनांका रोजी गणली जाईल)**
(सहाय्यक प्राध्यापक) :- **मागासवर्गीयांसाठी - ४५ वर्षे (जाहिरात प्रसिद्धी दिनांका रोजी गणली जाईल)**
क) वेतनश्रेणी :- सहाय्यक प्राध्यापक पदासाठी - **एकत्रित ठोक मासिक मानधन रु.१,००,०००/-** (रु.एक लाख फक्त)

**नियम व अटी**

१) अर्जदार हा सबंधीत पदासाठी शारीरीक व मानसिकदृष्टया सक्षम असावा. तसेच अर्जदाराविरुंध्द कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा. नियुक्तीनंतर उमेदवारास वैद्यकीय मंडळाचे वैद्यकीय प्रमाणपत्र ३ महिन्याच्या आत सादर करणे बंधनकारक राहील.
२) सदर रिक्त पदांच्या संख्येत बदल करणे बाबतचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांना राहतील.
३) अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्षरित्या कोणताही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल.
४) अर्जदाराचे नांव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत कायम नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.
५) अर्जदाराची नियुक्ती संचालनालयाकडून बंधपत्रीत उमेदवार उपलब्ध होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपाची असून जर शासनातर्फे निवड मंडळामार्फत/नामनिर्देशनाने/बदली अथवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत कायम स्वरुपाच्या उमेदवारास रुजू करण्यांत आलेस अर्जदाराची त्या पदावरील सेवा तात्काळ समाप्त करण्यांत येईल.
६) अर्जदार इतर कोणत्याही शासकिय/अशासकिय संस्थेत कार्यरत असल्यास त्यांनी कार्यरत असलेल्या संस्थेचे ना-हरकत (NOC) प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक असेल.

Scanned with OKEN Scanner

B) Medical Officer (Contract Basis)

| Sr. No. | Subject | Qualification | Total | Institute Name |
|---|---|---|---|---|
| 1 | Medical Officer (Trauma) | As per NMC Norms | 1 (Clear Vacant)<br>1 (संभाव्य रिक्त) | RCSMGMC Kolhapur |
| | Total | | 2 | |

अ) शैक्षणिक अर्हता :- **MBBS** (रुग्णसेवेची निकड व शैक्षणीक कामकाजाच्या निकडीच्या दृष्टीने बंधपत्रित पदव्युत्तर अर्हता धारक उमेदवारास प्राध्यांन्य दिले जाईल.)

ब) वयोमर्यादा (वैद्यकीय अधिकारी) :- **खुल्या वर्गासाठी – ३८ वर्षे (जाहिरात प्रसिद्धी दिनांक रोजी गणली जाईल)**

(वैद्यकीय अधिकारी) :- **मागासवर्गीयांसाठी – ४३ वर्षे (जाहिरात प्रसिद्धी दिनांक रोजी गणली जाईल)**

क) वेतनश्रेणी :- वैद्यकीय अधिकारी पदासाठी – **एकत्रित ठोक मासिक मानधन रु.७५,०००/- (रु.पंच्याहत्तर हजार फक्त) तसेच शैक्षणिक अर्हता पदव्युत्तर पदविका अथवा पदव्युत्तर पदवी धारण केली असल्यास रु.८५,०००/-(रु. पंच्याऐंशी हजार फक्त)**

<u>नियम व अटी</u>

१) अर्जदार हा सबंधीत पदासाठी शारीरीक व मानसिकदृष्टया सक्षम असावा. तसेच अर्जदाराविरुध्द कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा. नियुक्तीनंतर उमेदवारास वैद्यकीय मंडळाचे वैद्यकीय प्रमाणपत्र ३ महिन्याच्या आत सादर करणे बंधनकारक राहील.

२) सदर रिक्त पदांच्या संख्येत बदल करणे बाबतचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांना राहतील.

३) अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्षरित्या कोणताही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल.

४) अर्जदाराचे नांव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत कायम नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

५) अर्जदाराची नियुक्ती संचालनालयाकडून बंधपत्रीत उमेदवार उपलब्ध होईपर्यत तात्पुरत्या स्वरुपाची असून जर शासनातर्फे निवड मंडळामार्फत/नामनिर्देशनाने/बदली अथवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत कायम स्वरुपाच्या उमेदवारास रुजू करण्यांत आलेस अर्जदाराची त्या पदावरील सेवा तात्काळ समाप्त करण्यांत येईल.

उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने आवश्यक कागदपत्रासह दु.०१.०० वा.उपस्थित रहावे लागेल. उमेदवारांनी मुलाखतीसाठीचे अर्ज हे दुपारी १ ते २ या वेळेत स्वतः उपस्थित राहुन भरुन देण्याचे आहेत तसेच दुपारी २ नंतर आलेल्या उमेदवारांना मुलाखत अर्ज उपलब्ध करुन देण्यात येणार नाही. मुलाखत ही दिनांक ०८.१२.२०२३ रोजी दुपारी ०३.०० वाजता अधिष्ठाता कार्यालय, रा. छ. शा. म. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, शेंडा पार्क, कोल्हापूर यांचे कक्षात होईल. मुलाखतीसाठी स्वतंत्र पत्र पाठविले जाणार नाही याची नोंद घावी. **सदरच्या जाहिरातीतील पदसंख्या बदलण्याबाबतचा अथवा सदरची जाहिरात पुर्णतः रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठातांनी राखून ठेवला आहे.**

(डॉ.प्रदीप गुरव)
अधिष्ठाता
राजर्षी छत्रपती शाहू महाराज,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर

प्रति,

१) सूचना फलक, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर.
२) सुचना फलक, वैद्यकिय अधिक्षक कार्यालय, छ.प्र.रा.स.रु.कोल्हापूर.
३) सर्व प्राध्यापक व विभागप्रमुख, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर.
४) मुलांचे/मुलीचे/आवासी-निवासी वसतीगृह, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शा.वै.म., कोल्हापूर.
५) ग्रंथालय सूचना फलक, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर
६) सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये :- महाविद्यालयाचे नांव :-
(उपरोक्त अधिष्ठातांना विनंती करण्यात येते की, सदरची जाहिरात आपल्या महाविद्यालयाच्या सूचना फलकावर लावावीत.)

प्रत माहितीसाठी सविनय सादर :-

१) मा.अप्पर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
२) मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई - १
३) मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर
४) मा.उपसंचालक आरोग्य सेवा, कोल्हापूर

Scanned with OKEN Scanner